शैक्षणिक संदर्भ अंक १२४ जून-जुलै २०२०

# भारत महासत्ता व कावीळ

लेखक: डॉ. अनिल जोशी

# भारत महासत्ता व कावीळ

## लेखक: डॉ. अनिल जोशी

येत्या काही वर्षांत भारत एक जागतिक महासत्ता बनणार असे भाकीत हल्ली वेगवेगळ्या संदर्भात केले जाते. एक भारतीय म्हणून अशी वाक्ये वाचताना किंवा ऐकताना क्षणभर आनंद होतो. परंतु जागतिक महासत्ता हे शब्द उच्चारले की आपल्या सर्वांच्या समोर सध्यातरी एकाच देशाचे नाव येते आणि तो देश म्हणजे अमेरिका. सध्या चालू असलेल्या करोनाच्या जागतिक महामारी नंतर काही संदर्भ बदलले आहेत. चीनबाबत करोना साथ निवळल्यानंतर उर्वरित जगाची काय भूमिका असणार आहे यावर अजून काही संदर्भ बदलतील. काहीही असले तरी महासत्ता बनण्यासाठी काय काय करायला किंवा व्हायला पाहिजे याचा मापदंड म्हणजे ही अमेरिका.

केंचुकी (केंटुकी, केंचुकी हा उच्चार स्थानिक अमेरिकन मित्राने सांगितल्याप्रमाणे.) हे या खंडप्राय देशाच्या साधारण मध्यभागी असलेले एक राज्य. क्षेत्रफळ ४०,३९५ चौरस मैल. लोकसंख्या ४०,४१,४६९ इतकी. केंचुकी शब्दाचा स्थानिक बोलीभाषेतील शब्दशः अर्थ होतो 'लॅंड ऑफ टुमारो' (उद्याची आशा). या राज्यातून वाहणाऱ्या केंचुकी नदीमुळेच या राज्याला हे नाव मिळाले असावे असाही एक मतप्रवाह आहे.

अमेरिकन संघराज्याचा घटक असलेल्या या राज्याचे तेथील प्रथेनुसार स्वत:चे कायदेकानून आहेत व स्वत:चे एक सर्वोच्च न्यायालयही आहे. २९/१०/२००९ रोजी

या न्यायालयाने एक निकाल दिला. तो नुकताच माझ्या वाचण्यात आला. वादी होते श्रीयुत टिम एंबरटन, केंचुकी राज्याचे एक सन्माननीय नागरिक. प्रतिवादी केंचुकी राज्यात हॉटेलची साखळी चालवणारी 'जनरल मिल्स रेस्टॉरंट्स लिमिटेड' ही केंचुकीमधीलच ग्लासगो या शहरात स्थित कंपनी, या कंपनीचे 'रेड लॉबस्टर' हे नामांकित हॉटेल, ग्लासगो येथील स्थानिक आरोग्य खाते व त्यांचे संबंधित कर्मचारी.

सर्वोच्च न्यायालयापर्यंत जेव्हा एखादा खटला जातो त्यावेळी त्यामध्ये नक्कीच काहीतरी महत्त्वाच्या कायदेशीर बाबींचा उहापोह होणे अपेक्षित असते. या खटल्यातील विचाराधीन कायदेशीर बाबी होत्या; उत्पादनाबाबतची जबाबदारी (प्रॉडक्ट लायबिलिटी), उत्पादनाच्या गुणवत्तेबाबतची जबाबदारी व तिचा झालेला भंग (ब्रीच ऑफ वॉरंटी) व याबाबत एकंदरीत झालेला किंवा केलेला निष्काळजीपणा (निग्लिजन्स). आणि हो! हे उत्पादन होते रेड लॉबस्टर हॉटेलमध्ये २८ जुलै २००१ रोजी बनवलेले जेवण.




***चित्र : काविळीची लक्षणे***
*(स्रोत* https://marathivishwakosh.org/18968/*)*

२८ जुलै २००१ हा श्री टिम एंबरटन यांच्या सासूबाईंचा वाढदिवस. हा वाढदिवस एंबरटन कुटुंबीयांनी रेड लॉबस्टर मध्ये जेवण करून साजरा केला. २७ ऑगस्टच्या आसपास टिम यांना थंडी-ताप,

थकवा, पिवळी लघवी असा त्रास होऊ लागला. ३० ऑगस्टला त्यांना दवाखान्यात दाखल केले. ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर पर्यंत ते दवाखान्यात होते. तेथे झालेल्या सर्व चाचण्यांचे अनुमान होते की टिम यांना हिपॅटायटीस या विषाणूंच्या संसर्गाने होणारी कावीळ झाली आहे.

विषाणूजन्य काविळीचे महत्त्वाचे दोन प्रकार आहेत. दूषित अन्न किंवा पाणी यांच्या द्वारा तोंडावाटे संसर्ग होणारी कावीळ म्हणजे हिपॅटायटीस ए व दूषित रक्ताच्या संसर्गामुळे होणारी कावीळ म्हणजे हिपॅटायटीस बी.

अमेरिकेत विषाणूजन्य कावीळ हा 'नोटिफाएबल डिसीझ' आहे. याचा अर्थ असा की अशा आजारांचा एखादा रुग्ण उपचारासाठी आला तर त्याची माहिती स्थानिक आरोग्य खात्याला देणे वैद्यकीय व्यावसायिकांना बंधनकारक आहे. (तसे भारतातही अनेक आजार कळविणे बंधनकारक आहे. परंतु बऱ्याचदा ही बंधने कागदोपत्रीच असतात. ना वैद्यकीय व्यावसायिक याकडे लक्ष देतात ना आरोग्य खाते. पुण्यातील स्वाईन फ्लूच्या साथीवेळी पहिला बळी गेल्यानंतर याबाबत झालेला गदारोळ आपण सर्वांनी पाहिलेला आहे.)

टिम एंबरटन यांना झालेल्या काविळीची माहिती संबंधित रुग्णालयाने स्थानिक आरोग्य विभागाला कळविली आणि याची चौकशी करण्यासाठी साथरोग प्रसार व प्रतिबंध याविषयी विशेष प्रशिक्षण घेतलेल्या तज्ञांचे पथक कामाला लागले. त्यांनी श्री. टिम यांची भेट घेऊन सविस्तर माहिती घेतली. यामध्ये टिम यांनी केलेला प्रवास, बाहेर केलेले जेवण, रोग लक्षणे इत्यादी बाबींचा समावेश होता.

स्थानिक आरोग्य विभागाकडे त्याच सुमाराला ग्लासगो परिसरातील इतर तेरा रुग्णांना हिपॅटायटीस ए प्रकारची कावीळ झाल्याचा अहवाल आला होता. या तेरा लोकांची सविस्तर

माहिती घेण्यात आली. त्यातून या तेरा लोकांपैकी आठ जणांनी रेड लॉबस्टर हॉटेलात जेवल्याचे सांगितले आणि अर्थातच रेड लॉबस्टर मधील अन्नातून या आजाराचे संक्रमण झाले असावे अशी साधार शंका येऊ लागली.

आरोग्य विभागाच्या चौकशीत पुढे असे निष्पन्न झाले की "त्या" महिन्यात (जुलै-ऑगस्ट २००१) रेड लॉबस्टर मध्ये काम करणाऱ्या कॅरीस फेल्पस नावाच्या महिला कर्मचाऱ्यालाही हिपॅटायटीस ए प्रकारची कावीळ झालेली होती. प्राथमिक चौकशीत हॉटेल व्यवस्थापनाने आरोग्य विभागापासून ही माहिती दडवून ठेवली होती.

सार्वजनिक स्वच्छतेविषयी व त्याबाबतच्या नियमांविषयी अमेरिकेत लोक खूपच संवेदनशील आहेत. त्यामुळे प्रत्येक हॉटेलची स्वत:ची अशी कर्मचाऱ्यांकरता हँड वॉशिंग् पॉलिसी असते. नवीन भरती होणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला याबाबतचे प्रशिक्षण दिले जाते. नुसते प्रशिक्षण देऊन थांबत नाहीत तर प्रत्येक कर्मचारी दिलेल्या सूचनांचे पालन करतो आहे की नाही यावरही हॉटेल प्रशासनाचे बारीक लक्ष असते व प्रत्येक कामगाराचा याबाबतीत ठराविक कालावधीनंतर आढावा घेतला जातो. रेड लॉबस्टर मध्येही असा आढावा घेतला जायचा.

कॅरीस फेल्पस काहीवेळा स्वच्छता नियमांकडे कानाडोळा करते असा अहवाल असूनही व्यवस्थापनाने याकडे दुर्लक्ष केल्याचे आढळले. स्थानिक आरोग्य विभागाने तातडीने रेड लॉबस्टरच्या इतर सर्व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांना हिपॅटायटीस ए ची बाधा नसल्याची खात्री केली. या सर्व कर्मचाऱ्यांना कावीळ प्रतिबंधक इंजेक्शनेही देण्यात आली.

टिम यांना आजारातून पूर्ण बरे होण्यासाठी सहा-सात महिन्यांचा कालावधी लागला. स्थानिक आरोग्य विभागाने रेड लॉबस्टर मधील एका महिला कर्मचाऱ्याच्या माध्यमातून या काविळीचा संसर्ग झाल्याची माहिती मात्र श्री. टिम एंबरटन यांना कळविली नाही.

यानंतर सुमारे तीन वर्षांचा कालावधी सुरळीत गेला. तीन वर्षांनी टिम यांना एका वकील महाशयांचा फोन आला. रेड लॉबस्टर मध्ये खाल्ल्याने कावीळ झालेल्या आठपैकी दोन व्यक्तींनी या हॉटेलवर नुकसानभरपाईचा दावा केला होता व तो दावा या वकील महाशयांकडे होता. त्यांच्या सल्ल्याने टिम यांनी देखील नुकसानभरपाईचा दावा केला . परंतु अशा प्रकारचे दावे दाखल करण्यासाठी असलेली एक वर्षाची कालमर्यादा ओलांडल्याचे तांत्रिक कारण दाखवत खालच्या कोर्टाने तो फेटाळला. त्याविरोधात टिम व त्यांचे वकील यांनी सर्वोच्च न्यायालयात अपील केले.

अपिलाचा निकाल टिम एंबरटन यांच्या बाजूने लागला. उपचार खर्च आठ हजार डॉलर्स व नुकसानभरपाई पोटी दोन लाख बावीस हजार डॉलर्स अशी घसघशीत रक्कम एंबरटन यांना मिळाली. एंबरटन यांचेशी संपर्क साधून त्यांना खटला भरण्यास प्रवृत्त करणाऱ्या वकील महाशयांना घसघशीत फी मिळाली असणार यात काही शंका नाही. स्थानिक आरोग्य विभाग व त्यांचे कर्मचारी यांना मात्र दोषमुक्त करण्यात आले.


कावीळ, हगवण, विषमज्वर व यासारख्या दूषित पाण्याने होणाऱ्या रोगांबाबत भारत ही महासत्ता आहे. प्रतिवर्षी शेकडो हजारो लोकांना हिपॅटायटीस ए होत असतो, पण आम्ही त्याचे असे अवाजवी अवडंबर माजवत नाही. असे आजार न झाल्यास लोकांची प्रतिकारशक्ती कशी वाढणार? अशी वाढीव सामुदायिक प्रतिकारशक्ती असणाऱ्या लोकांच्या

जीवावर तर आपण अजून वीस तीस वर्षांनी जग पादाक्रांत करणार आहोत. भारत हा पूर्वापार अध्यात्मिक परंपरा असलेला एक महान देश आहे. त्यामुळे हात धुणे, सार्वजनिक ठिकाणी शौचास न बसणे, शिंकणे, खोकणे यासारख्या बाबी टाळणे या आमच्या दृष्टीने फारच आधिभौतिक बाबी झाल्या. "नाही निर्मळ मन, काय करील साबण" हे या भंपक अमेरिकन लोकांना कधी कळणार कोणास ठाऊक?

---

## *भारतातील कावीळ*

*पावसाळा सुरू झाला की भारतात काविळीचे रुग्ण मोठ्या संख्येने आढळून येतात. खरे पहायचे झाले तर कावीळ हे आजाराचे नाव नसून लक्षण समुदायाचे नाव आहे. मुख्यत्वेकरून डोळे पिवळे होणे व लघवी पिवळी होणे ही दोन लक्षणे.*




***भारतामध्ये २०११ ते २०१३ या कालावधीमध्ये नॅशनल इंटिग्रेटेड डिसीज सर्व्हीलंस प्रोग्राम (IDSP) अंतर्गत हिपॅटायटीस ए आणि हिपॅटायटीस ई या काविळींच्या प्रकारांचा वेगवेगळ्या राज्यांत अभ्यास केला गेला. या आलेखामध्ये दोन्ही काविळींच्या नोंद झालेल्या, चाचणी केलेल्या व निश्चित झालेल्या प्रकरणांची संख्या दर्शवली आहे.***

https://www.ncbi.nlm.nih.gov/pmc/articles/PMC4584861/

*कावीळ होण्याची काही महत्त्वाची कारणे खालीलप्रमाणे:*


*१. विषाणूजन्य कावीळ: हिपॅटायटीस नावाच्या विषाणू संसर्गाने ही कावीळ होते. या विषाणूचे ए, बी, सी, डी, ई हे पूर्वापार चालत आलेले पाच प्रकार आहेत. त्यात जी या सहाव्या प्रकाराची नुकतीच भर पडली आहे. यातील ए व ई हे प्रकार दूषित पाण्याद्वारे संक्रमित होतात तर बी व सी हे दूषित रक्ताद्वारे.*

*२. मद्यपान*

*३. काही औषधांचे दुष्परिणाम आणि त्यामुळे होणारी कावीळ*

*४. अवरोधक कावीळ: पित्ताशयाच्या नळीला कोणत्याही कारणाने अवरोध निर्माण झाल्यास ही कावीळ होते.*

*५. काही जन्मजात आजारांमुळे होणारी कावीळ*




***२०११ ते २०१३ या काळात भारतीतील राज्यांमध्ये आढळलेले हिपॅटायटीस ए आणि हिपॅटायटीस ई काविळींचे उद्रेक. अशुद्ध पाणी आणि अस्वच्छता या दोन प्रमुख गोष्टी या साथींस कारणीभूत असल्याचे दिसून आले. हिपॅटायटीस ए या काविळीची साथ ऋतुमानावर आधारित असून पावसाळ्यात याचा उद्रेक होतो असे दिसून आले.***

***https://www.ncbi.nlm.nih.gov/pmc/articles/PMC4584861/***

§§§

---


लेखक : **डॉ. अनिल जोशी**, एमबीबीएस, एम डी पॅथॉलॉजी, सेवानिवृत्त मुख्य वैद्यकीय अधिकारी, पंढरपूर नगर परिषद.

**इमेल :** jaysss12@gmail.com



*(कळीचे शब्द: विज्ञान, कावीळ, साथीचे रोग, काविळीचे प्रकार, काविळीची लक्षणे, भारतातील कावीळ)*